नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३५३ Issue - 353 | वार शनिवार दि. १६ मे २०२६ Blow- Saturday Date 16 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## भारत आणि यूएई यांच्यात सात करारांवर सहमती

### कच्चे तेल आणि एलपीजीचा स्थिर पुरवठा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अबुधाबी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यूएई दौऱ्यादरम्यान ७ महत्त्वाच्या विषयांवर सहमती झाली आहे. दोन्ही देशांमध्ये सामरिक संरक्षण भागीदारीच्या चौकटीवर करार करण्यात आला. ऊर्जा क्षेत्रात रणनीतिक पेट्रोलियम साठा तसेच द्रवीकृत पेट्रोलियम वायू (एलपीजी) पुरवठ्याशी संबंधित करारांवर सहमती झाली. गुजरातमधील वाडिनार येथे शिप रिपेअर क्लस्टर उभारण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. याशिवाय भारतीय पायाभूत सुविधा क्षेत्र, आरबीएल बँक आणि सन्मान कॅपिटलमध्ये ५ अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा करण्यात आली.



परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील रणनीतिक पेट्रोलियम साठा तसेच अबूधाबी नॅशनल ऑइल कंपनीशी संबंधित कराराचा उद्देश भारताची ऊर्जा सुरक्षा अधिक मजबूत करणे हे आहे. यामुळे भारताला कच्चे तेल आणि एलपीजीचा स्थिर पुरवठा सुनिश्चित होईल. भविष्यात जागतिक संकट किंवा तेलाच्या किमतींमध्ये होणाऱ्या चढ-उतारांच्या काळात हा करार भारतासाठी दिलासादायक ठरणार आहे. एलपीजी पुरवठा सहकार्य कराराअंतर्गत यूएई भारताला दीर्घकालीन आधारावर द्रवीकृत पेट्रोलियम वायू उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळे भारताच्या देशांतर्गत गॅस गरजा पूर्ण करण्यास मदत होईल. हा करार ऊर्जा सुरक्षा वाढवण्यासोबतच दोन्ही देशांमधील आर्थिक आणि सामरिक भागीदारी अधिक मजबूत करेल.

भारत आणि यूएई यांच्यातील रणनीतिक संरक्षण भागीदारी चौकटीचा उद्देश संरक्षण उद्योगातील सहकार्य वाढवणे हा आहे. याअंतर्गत दोन्ही देश संरक्षण तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि सागरी सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवतील. त्यामुळे प्रादेशिक सुरक्षा आणि दोन्ही देशांतील सामरिक संबंध अधिक दृढ होतील.

वाडिनार येथे शिप रिपेअर क्लस्टर उभारण्याचा करार भारताच्या सागरी आणि औद्योगिक क्षेत्राला नवी गती देणार आहे. त्यामुळे जहाज दुरुस्ती उद्योगाला चालना मिळेल आणि 'मेक इन इंडिया' अभियान अधिक बळकट होईल.

या प्रकल्पामुळे स्थानिक स्तरावर रोजगार आणि गुंतवणुकीच्या संधीही वाढतील.

जहाज बांधणी आणि दुरुस्ती क्षेत्रातील कौशल्य विकास सहकार्याचा उद्देश भारतीय युवकांना आधुनिक तांत्रिक प्रशिक्षण देणे हा आहे. त्यामुळे भारतात शिपबिल्डिंग आणि शिप रिपेअर क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ तयार होईल. भारतामध्ये एआय सुपर कम्प्युटिंग क्लस्टर स्थापन करण्याच्या कराराअंतर्गत यूएईची तंत्रज्ञान कंपनी भारतात अत्याधुनिक डेटा सेंटर आणि सुपर कम्प्युटर क्षमता विकसित करेल. त्यामुळे भारताच्या कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधन आणि डिजिटल नवोन्मेष अभियानाला गती मिळेल तसेच तंत्रज्ञान क्षेत्रात नव्या संधी निर्माण होतील.

## नीट परीक्षा पुढील वर्षापासून संगणक आधारित चाचणी (सीबीटी)पद्धतीने होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पुढील वर्षापासून नीट यूजी परीक्षा संगणक आधारित (सीबीटी) पद्धतीने घेतली जाणार आहे, अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शुक्रवारी दिली. त्यांनी सांगितले की सरकार स्वच्छ, पारदर्शक आणि सुरक्षित परीक्षा प्रणालीसाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत प्रधान यांनी आश्वासन दिले की परीक्षेत अनुचित मार्गांचा वापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा गटाला कोणतीही सूट दिली जाणार नाही. प्राथमिक तपासात १२ मेपर्यंत असे समोर आले की प्रश्नपत्रिका 'गेस पेपर' नेटवर्कच्या आडून लीक करण्यात आली होती. पात्र आणि योग्य विद्यार्थ्यांवर याचा कोणताही परिणाम होऊ नये याला सरकार प्राधान्य देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. परीक्षेतील पारदर्शकतेवर भर देत त्यांनी सांगितले की कोणत्याही परिस्थितीत पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही अशी ग्वाही प्रधान यांनी दिली.

नीट परीक्षा सीबीटी मोडमध्ये घेण्यात येणार म्हणजे परीक्षा केंद्रावर गेल्यावर तुमच्या रोल नंबरनुसार तुम्हाला एक ठराविक संगणक दिला जाईल. सुरक्षेच्या कारणास्तव या संगणकाला कीबोर्ड जोडलेला नसतो. तुम्हाला स्क्रीनवरील प्रश्नांची उत्तरे फक्त माऊसने क्लिक करून द्यावी लागतात. स्क्रीनवर एका वेळी एक प्रश्न आणि त्याचे ४ पर्याय दिसतील. जर तुम्ही एखाद्या प्रश्नाचे उत्तर चुकवले, तर परीक्षा संपेपर्यंत तुम्ही ते कधीही बदलू किंवा दुरुस्त करू शकता. देशभरातून २२ लाखांहून अधिक विद्यार्थी ही परीक्षा देतात. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर्स उपलब्ध व्हावेत म्हणून ही परीक्षा वेगवेगळ्या वेळेमध्ये घेतली जाऊ शकते. नीट पेपरफुटी प्रकरणी लातूरमध्ये निवृत्त प्राध्यापक सीबीआयच्या ताब्यात वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षेच्या कथित पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने लातूर येथील निवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना सीबीआयने ताब्यात घेतल्याची चर्चा असून, या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. नीट परीक्षेचा प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रक्रियेत पी. व्ही. कुलकर्णी यांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. संबंधित प्रश्नपत्रिका तयार करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती का, याबाबत सीबीआयकडून सखोल चौकशी सुरू असल्याचे समजते.या प्रकरणाचे धागेदोरे लातूरपर्यंत पोहोचल्याची शक्यता वर्तवली जात असून, तपासाच्या कक्षेत आणखी काही व्यक्तींची चौकशी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**नीटची पुनर्परीक्षा २१ जून रोजी होणार**

राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) ने केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर नीट (यूजी) २०२६ ची पुनर्परीक्षा २१ जून रोजी आयोजित करण्याची घोषणा केली आहे. संस्थेने सोशल मीडियावर परीक्षार्थी आणि पालकांना आवाहन केले आहे की, त्यांनी केवळ एनटीएच्या अधिकृत माध्यमांवर जारी करण्यात आलेल्या माहितींवरच विश्वास ठेवावा. संस्थेने कोणतीही माहिती किंवा मदतीसाठी पशर्शी-सिपीर. रल.ळप हा ई-मेल तसेच ०११-४०७५९००० आणि ०११-६९२२७७०० हे हेल्पलाइन क्रमांक जारी केले आहेत. दरम्यान, काल उशिरा रात्री शिक्षणमंत्र्यांच्या निवासस्थानी नीट परीक्षेबाबत उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. दरम्यान, गेल्या ३ मे रोजी झालेल्या परीक्षेनंतर काही अनियमितता समोर आल्यानंतर पुनर्परीक्षेची घोषणा करण्यात आली.

## सीबीआयची मोठी कारवाई; नीट पेपरफुटीचा मास्टरमाईंड सापडला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नीट पेपरफुटीच्या प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे. या पेपरफुटीचा मास्टरमाईंड सीबीआयच्या ताब्यात आला असून पी व्ही कुलकर्णी असं त्याचं नाव आहे. सीबीआयने कुलकर्णीला लातूरमधून ताब्यात घेतलं असून तो एनटीएशी संबंधित असल्याचंही समोर आलं आहे. ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेचा पेपर आधीच फुटल्याचं समोर आल्यानंतर ती परीक्षा रद्द करण्यात आली आहे.

नीट पेपरफुटीच्या प्रकरणात आतापर्यंत अनेकजणांना ताब्यात घेण्यात आलं आहे. पण त्याचा मास्टरमाईंड आता सीबीआयच्या ताब्यात आला आहे. पी व्ही कुलकर्णी हा पुण्यात केमेस्ट्रीचा प्राध्यापक म्हणून काम करायचा अशी माहिती समोर आली आहे. कुलकर्णी हा एनटीएशी संबंधित असून त्यानेच पेपर फोडल्याची माहिती आहे.

नीट पेपरफुटीचं महाराष्ट्र कनेक्शन समोर आल्यानंतर आता लातूरही सातत्यानं सीबीआयच्या रडारवर आहे. दोन दिवसांपूर्वी लातूरमध्ये झालेल्या तपास आणि चौकशीनंतर पी व्ही कुलकर्णीला ताब्यात घेण्यात आलं आहे.

कुलकर्णी हा चार वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाला असल्याची माहिती आहे. पुण्यात ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारेच्या तो संपर्कात असल्याचंही समोर आलं आहे. याच धाग्यावरून सीबीआयचे पथक लातूरपर्यंत पोहोचले. त्यानंतर कुलकर्णीची सखोल चौकशी करण्यात आली.

लातूरच्या कैलासनगर मधील कुलकर्णींच्या घराला सध्या कुलूप असून त्याचे कुटुंब पुण्यात राहत असल्याची माहिती आहे. सीबीआयचे दुसरे पथक अद्याप लातूरमध्ये ठाण मांडून आहे. दरम्यान, लातूरमधील सुतमील परिसरातील खासगी क्लास चालकाच्या घरी सीबीआयनं ११ तास तपासणी केली. यावेळी क्लास चालकाच्या घरातून काही कागदपत्रंही जप्त करण्यात आली आहेत.

## २६ मे रोजी मान्सून केरळमध्ये होणार दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे: राज्यात एका बाजूला प्रचंड उष्णतेचा कहर सुरू असताना दुसऱ्या बाजूला अवकाळी पावसाने बळीराजाची चिंता वाढवली आहे. हवामानातील सततच्या बदलामुळे फळबागा, भाजीपाला आणि शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून आता हवामान विभागाने शनिवारी राज्यासाठी दुहेरी इशारा जारी केला आहे. काही भागांत उष्णतेची लाट तर काही भागांत मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

हवामान खात्याने शनिवारी (१६ मे २०२६) साठीचा अंदाज जाहीर केला आहे. त्यानुसार उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील तुरळक भागांत उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर कोकण-गोवा भागात उष्ण आणि दमट हवामान राहणार आहे. दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस, तसेच ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्रातही मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.



मुंबईत सकाळी अंशत: ढगाळ वातावरण राहणार असून उष्ण आणि दमट हवामानाचा त्रास जाणवू शकतो. शहरातील कमाल तापमान ३५ अंश तर किमान तापमान २७ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

राज्यातील तापमानात पुढील काही दिवस चढ-उतार पाहायला मिळणार आहेत. हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढील चार दिवसांत महाराष्ट्रातील कमाल तापमानात १ ते २ अंश सेल्सिअसने वाढ होईल. त्यानंतर तापमानात २ ते ३ अंशांनी घट होण्याची शक्यता आहे. तर काही भागात किमान तापमानातही किरकोळ वाढ होण्याचा अंदाज आहे.

**बळीराजासह शहरी नागरिकांना उष्णतेचा मोठा फटका**

दरम्यान, राज्यातील अनेक शहरांमध्ये तापमानाने ४० अंशांचा टप्पा ओलांडला आहे. अकोला येथे सर्वाधिक ४५.९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. वर्धा ४५.५, जळगाव ४५.३, अमरावती ४५.२, नागपूर ४४, परभणी ४३.९ आणि यवतमाळ येथे ४३.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्यामुळे नागरिकांसह शेतकरी वर्गाला उष्णतेचा मोठा फटका बसत आहे.

दरम्यान, यंदाच्या मान्सूनबाबत हवामान विभागाने मोठा अंदाज व्यक्त केला आहे. केरळमध्ये नैऋत्य मान्सून वेळेआधी दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. शुक्रवारी जाहीर करण्यात आलेल्या अंदाजानुसार, २६ मे २०२६ रोजी मान्सून केरळ किनारपट्टीवर पोहोचू शकतो. मात्र, या तारखेत चार दिवसांचा फरक असू शकतो. त्यामुळे २२ मे ते ३० मे दरम्यान कधीही मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे. **(पान २ वर....)**

## प्रीतम यावलकर शहर उपायुक्त तर विजय कबाडे ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (परशुराम कोकणे) : सोलापूर शहर आणि ग्रामीण पोलीस दलात मोठे प्रशासकीय फेरबदल झाले आहेत. गृह विभागाच्या ताज्या आदेशानुसार, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यात सोलापूर शहर आणि ग्रामीणमधील अधिकाऱ्यांची अदलाबदल झाली असून, नागपूरहून एका महिला आयपीएस अधिकाऱ्याची सोलापुरात एन्ट्री झाली आहे.

**प्रीतम यावलकर आणि विजय कबाडे यांची अदलाबदल!**

अशा झाल्या आहेत बदल्या -

प्रीतम यावलकर (अपर पोलीस अधीक्षक, ग्रामीण) यांची सोलापूर शहर पोलीस उपायुक्त (ऊझ) पदावर बदली करण्यात आली आहे.

विजय कबाडे (पोलीस उपायुक्त, शहर) यांच्याकडे आता सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या अप्पर पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

गौहर हसन (पोलीस उपायुक्त, शहर मुख्यालय) यांची पुणे शहर पोलीस उपायुक्त पदावर बदली झाली आहे.

वृष्टी जैन (सहाय्यक पोलीस अधीक्षक, नागपूर) यांची सोलापूर शहरात



पोलीस उपायुक्त (ऊझ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सोलापूर प्रशासनात आता 'आयएएस-आयपीएस' दांपत्य!

सोलापूरच्या नव्या पोलीस उपायुक्त वृष्टी जैन या सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (उएज) कुशल जैन यांच्या पत्नी आहेत. त्यामुळे आता सोलापूर जिल्हा परिषद आणि सोलापूर पोलीस दल अशा दोन्ही महत्त्वाच्या ठिकाणी हे अधिकारी दांपत्य कार्यरत राहणार आहे.

## शेतकऱ्यांसाठी सर्व विरोधक रस्त्यावर उतरत एकवटताच मुंबई पोलिसांनी फरफटत नेलं, राजू शेट्टींचा संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात आज (१५ मे) मुंबईत काजू आणि आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी एल्गार करण्यात आला. या आंदोलनात शेतकऱ्यांसाठी सर्व विरोधक एकटवले. मात्र, मोर्चाला परवानगी नसल्याचे सांगत मुंबई पोलिसांनी मोर्चेकऱ्यांना फरफटत नेत गाडीत कोंबले. राजू शेट्टी यांना फरफटत नेण्यात आले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, महादेव जानकर यांच्यासह मराठी भाषा केंद्राचे दीपक पवार यांनाही उचलून नेले. यंदा काजू आणि आंबा या दोन्ही फळ पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.याचबरोबर केंद्र सरकारने साखर आणि कांद्यावर लादलेल्या निर्यातबंदीचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. हा मोर्चा गिरगाव चौपाटीवरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' या निवासस्थानाकडे जाणार होता. आंदोलकांनी निषेध म्हणून रस्त्यावर आंबे फेकून आपला संताप व्यक्त केला.

पोलिसांनी आंदोलकांना शिवालय बंगल्याजवळ रोखले आणि राजू शेट्टी, हर्षवर्धन सपकाळ, अर्जुन महादेव जाणकर, शेखर जयंत पाटील आणि विनायक राऊत यांसारख्या दिग्गज नेत्यांना ताब्यात घेतले. आंदोलकांवर बळाचा वापर आणि धक्काबुक्की झाली. या आंदोलनात शेतकरी संघटनांसोबतच शिवसेना (ठाकरे गट) आणि काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**'फडणवीस परिणाम भोगावे लागतील, आम्ही गुन्हा केलेला नाही'**

राजू शेट्टी यांनी पोलिसांच्या कारवाईवर आणि मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेवर तीव्र टीका केली. ते म्हणाले की, आम्ही शिवालयमध्ये जमलेलो होतो. तिथून अचानक पोलीस त्या ठिकाणी आले आणि त्यांनी आम्हाला सांगितलं की तुम्हाला आम्ही ताब्यात घेत आहोत. मी त्यांना विचारलं की जोपर्यंत आम्ही आंदोलन स्थळापर्यंत येत नाही तोपर्यंत तुम्हाला आम्हाला ताब्यात घेण्याचा काही एक अधिकार नाही. तेव्हा त्यांनी उर्मट भाषा केली. बळाचा वापर करून, धक्काबुक्की करून, लाठीचार्ज करून अनेकांना जखमी केलं आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

## ऐतिहासिक करार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यूएई दौऱ्यादरम्यान ७ महत्त्वाच्या विषयांवर सहमती झाली आहे. दोन्ही देशांमध्ये सामरिक संरक्षण भागीदारीच्या चौकटीवर करार करण्यात आला. ऊर्जा क्षेत्रात रणनीतिक पेट्रोलियम साठा तसेच द्रवीकृत पेट्रोलियम वायू (एलपीजी) पुरवठ्याशी संबंधित करारांवर सहमती झाली. गुजरातमधील वाडिनार येथे शिप रिपेअर क्लस्टर उभारण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. याशिवाय भारतीय पायाभूत सुविधा क्षेत्र, आरबीएल बँक आणि सन्मान कॅपिटलमध्ये ५ अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा करण्यात आली. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील रणनीतिक पेट्रोलियम साठा तसेच अबूधाबी नॅशनल ऑइल कंपनीशी संबंधित कराराचा उद्देश भारताची ऊर्जा सुरक्षा अधिक मजबूत करणे हे आहे. यामुळे भारताला कच्चे तेल आणि एलपीजीचा स्थिर पुरवठा सुनिश्चित होईल. भविष्यात जागतिक संकट किंवा तेलाच्या किमतींमध्ये होणाऱ्या चढ-उतारांच्या काळात हा करार भारतासाठी दिलासादायक ठरणार आहे. एलपीजी पुरवठा सहकार्य कराराअंतर्गत यूएई भारताला दीर्घकालीन आधारावर द्रवीकृत पेट्रोलियम वायू उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळे भारताच्या देशांतर्गत गॅस गरजा पूर्ण करण्यास मदत होईल. हा करार ऊर्जा सुरक्षा वाढवण्यासोबतच दोन्ही देशांमधील आर्थिक आणि सामरिक भागीदारी अधिक मजबूत करेल. भारत आणि यूएई यांच्यातील रणनीतिक संरक्षण भागीदारी चौकटीचा उद्देश संरक्षण उद्योगातील सहकार्य वाढवणे हा आहे.

## २६ मे रोजी मान्सून केरळमध्ये होणार दाखल

(पान १ वरून...)

साधारणपणे केरळमध्ये मान्सून दाखल होण्याची अधिकृत तारीख १ जून मानली जाते. मात्र, यंदा वातावरणीय परिस्थिती अनुकूल असल्याने मान्सून वेळेपूर्वीच सक्रिय होण्याचे संकेत मिळत आहेत. सध्या दक्षिण बंगालचा उपसागर, अंदमान समुद्र आणि अंदमान-निकोबार बेटांच्या परिसरात मान्सूनच्या प्रगतीसाठी पोषक हवामान तयार होत असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

दरम्यान, यंदाच्या पावसाबाबतही हवामान विभागाने प्राथमिक अंदाज जाहीर केला आहे. देशात सरासरीच्या तुलनेत ९२ टक्के पाऊस होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# देवाभाऊंच्या कार्यपद्धतीतली संवेदनशीलता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उन लागून बेशुध्द पडलाय हो तो त्याला कॅन्सर झाला सांगता, तुमचं डोक्सं ठिकाणावर आहे का?

माऊली दाटलेल्या कंठाने समोर उभ्या डॉक्टरला उलट प्रश्न विचारत होती.

संध्याकाळची वेळ नागपूरच्या सावित्रीबाई फुले नगरमधल्या छोट्याशा अंगणात ३ वर्षांचा विवेक आपल्या मित्रांसोबत खेळत होता. त्याची आई नुकतीच कामावरून परतली होती वडिलांचीही घरी येण्याची वेळ झाली होती. सगळं अगदी रोजच्यासारखंच सुरू होतं तितक्यात विवेकचा मित्र धावत घरात आला.

काकू काकू अशी घाबरलेली आरोळी त्याने दिली

तो आवाज ऐकूनच विवेकच्या आईचं काळीज दडपलं. भीतीने ती धावत बाहेर आली आणि समोरचं दृश्य पाहून तिचे पाय थरथर कापू लागले.

लहानगा विवेक रक्ताच्या उलट्या करत होता क्षणभर तिला काहीच सुचलं नाही डोळ्यासमोर अंधार दाटला काय होतंय? का होतंय? हेच कळत नव्हतं

स्वतःला कसंबसं सावरत तिने आपल्या लेकराला मिठीत घेतलं. आजूबाजूचे लोक धावून आले. कुणी पाणी आणलं कुणी गुळण्या करायला सांगितलं आई आपल्या पदराने त्याचे तोंड पुसत त्याला घरात घेऊन गेली.. पण तिच्या मनात भीती भरली गेली होती..

काही वेळातच कामावरून वडील किरण देशमुख घरी आले. पत्नीने घडलेला प्रकार त्यांना सांगितला आणि दोघांनीही क्षणाचाही विलंब न करता विवेकला रुग्णालयात नेलं.

तपासण्या सुरू झाल्या, रिपोर्ट आले आणि देशमुख दाम्पत्याच्या पायाखालची जमीनच सरकली.

अवघ्या ३ वर्षांच्या विवेकला रक्ताचा कर्करोग झाला होता.

डॉक्टरांनी सांगितलं त्वरित केमोथेरपी आणि उपचार सुरू करावे लागतील.

नाहीतर

हातमजुरी करून संसार चालवणाऱ्या आई-वडिलांसमोर सर्वात मोठा प्रश्न उभा राहिला इतके पैसे कुठून आणायचे? विवेकची आई तिथेच रडायला लागली.

माझ्या लेकरालाच का? उपचार कसे करणार? पैसे कुठून आणणार? माझा विवेक वाचेल ना? ती रडता रडता नवऱ्याला धरून प्रश्न विचारत होती छाती बडवत होती आणि समोर उभा असलेला बाप बाहेरून शांत दिसत असला तरी आतून पूर्णपणे तुटला होता.

पत्नीला धीर देत तो म्हणत होता देवावर विश्वास ठेव काहीतरी मार्ग निघेल पण त्या वाक्यामागे स्वतःची भीती लपवणारा एक असहाय्य बाप उभा होता.

अशातच काही लोकांनी त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीबद्दल सांगितलं मनात शंका होती आपण गरीब माणसं आपली कुठे ओळख? आपल्याला मदत मिळेल का? तरीही आशेचा एक धागा पकडत त्यांनी नागपूर येथील मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष गाठला

विवेकची परिस्थिती पाहून माहिती तातडीने मुख्यमंत्री देवेंद्रजींपर्यंत पोहोचवण्यात आली आणि क्षणाचाही विलंब न करता त्यांनी विवेकसाठी ३ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आणि फक्त मदतच नाही तर उपचारात कोणतीही कमतरता राहता कामा नयेअसे स्पष्ट आदेशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

त्या मदतीमुळे नागपूरच्या व्होकहार्ट




रुग्णालयात विवेकवर तातडीने केमोथेरपी आणि आवश्यक उपचार सुरू झाले

विवेक उपचारांना सकारात्मक प्रतिसाद देतोय त्याच्या प्रकृतीत सुधारणा होतेय आणि काही दिवसांपूर्वी वेदनेने रडणाऱ्या त्या चेहऱ्यावर आता पुन्हा हास्य फुलताना दिसतंय त्या आई-वडिलांसाठी ते हास्य म्हणजे नवजीवनच ठरलं..

योग्य वेळी मदत मिळाली नसती तर कदाचित त्यांचा विवेक..... पुढे विचार न केलेला बरा कारण ती परिस्थिती देवाभाऊंनी त्यांच्यावर येऊ दिली नाही.. त्यामुळे देवाभाऊंचे आभार मानताना त्या आई-वडिलांच्या डोळ्यात अश्रू होते ती आई भरल्या डोळ्यांनी म्हणाली.. माझ्या भावाने आज माझ्या मुलाला वाचवलं यापेक्षा मोठी भाऊबीज माझ्यासाठी काय असणार.

हे फक्त एकच उदाहरण नाही तर २०२४ साली मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्रजींनी केलेल्या पहिल्याच कामांपैकी एक काम म्हणजे पुण्यातील चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना बोन मॅरो ट्रान्सप्लांटसाठी ५ लाख रुपयांची मदत मंजूर केली..

कर्जतचा वेदांत आठवत असेल

थॅलेसेमियासारख्या गंभीर आजाराशी झुंज देणाऱ्या त्या चिमुकल्याला योग्य वेळी मदत मिळाली आणि तो मृत्यूच्या दारातून परत आला नंतर तो आपल्या आई-वडिलांसोबत देवाभाऊंना भेटायला गेला देवाभाऊ समोर दिसताच त्या परिवाराच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले आज आम्ही देवालाच भेटलोअशी भावना वेदांतच्या वडिलांनी व्यक्त केली होती आईच्या तोंडून शब्द फुटत नव्हते ती फक्त कृतज्ञतेने देवाभाऊंकडे पाहत होती वेदांतने हात जोडून म्हटलं तुमच्यामुळे मला नवजीवन मिळालं आणि देवाभाऊंनीही स्मित हास्य करत त्याच्या डोक्यावर हात ठेवून त्याला निरोगी आयुष्याचा आशीर्वाद दिला.

असाच आणखी एक प्रसंग

छत्रपती संभाजीनगरमधील कॅन्सरग्रस्त वेदांत भागवत पवार मोलमजुरी करणाऱ्या त्या आई-वडिलांनी देवाभाऊंमुळे आपल्या मुलाला जीवदान मिळालं म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १०१ रुपयांची मदत आणि एक पत्र पाठवलं होतं योगायोग म्हणजे ते पत्र देवाभाऊंच्या वाढदिवशीच त्यांच्यापर्यंत पोहोचलं पत्र वाचून देवाभाऊ भावुक झाले आणि म्हणाले वाढदिवशी यापेक्षा मोठी भेट अजून काय असू शकते.

देवाभाऊंच्या कार्यपद्धतीतली संवेदनशीलता आपण पाहिलीच आहे..

स्वतःच्या वडिलांना कॅन्सरमुळे गमावल्याची वेदना त्यांनी जवळून अनुभवली आहे त्यांच्यावर आलेला प्रसंग पुन्हा कोणावर येऊ नये या साठीच लहानपणी पाहिलेलं एक स्वप्न त्यांनी सत्यात उतरवलं नागपूरमध्ये त्यांनी अत्याधुनिक आणि सर्व सुविधांनी सुसज्ज आशियातील सर्वात मोठं कॅन्सर इन्स्टिट्यूट उभं केलं आज महाराष्ट्रासह इतर राज्यांतील हजारो रुग्ण तिथे अल्प दरात उपचार घेऊन बरे होतायेत.. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून गेल्या वर्षभरात ४० हजारांपेक्षा अधिक रुग्णांना ३३३ कोटी रुपयांहून अधिक वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाला FCR फॉरेन कंट्रीब्युशन रेगुलेशन ॲक्ट प्रमाणपत्र मिळालं आणि असा मान मिळवणारा तो देशातील पहिला कक्ष ठरला आपल्याला माहिती आहे देवाभाऊ हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यालयीन कामे अधिक सोयीस्कर करण्याचा प्रयत्न करत आहेत.. त्यातच गरजू रुग्णांना अधिक वेगाने मदत मिळावी म्हणून मुख्यमंत्री सहायता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्ययावत ऑनलाइन प्रणालीही सुरू केली आहे. आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया केवळ कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे रुग्णाला वेगवेगळ्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणार नाहीत थेट रुग्णालयातून प्रक्रिया होणार कारण देवाभाऊंची एकच भावना आहे पैशांच्या अभावी कोणाचाही उपचार थांबता कामा नये.

आज महाराष्ट्रातील हजारो कुटुंबांसाठी मुख्यमंत्री सहायता निधी ही योजना जीवनदान देणारी ठरत आहे.. इतरांच्या आयुष्यासाठी झटणाऱ्या, अनोळखी लोकांच्या वेदनाही स्वतःच्या मानणाऱ्या या संवेदनशील नेतृत्वाचं कार्य असंच लाखो पटींनी वाढत राहो महाराष्ट्रातील दिनदुबळ्यांची सेवा देवदूत देवाभाऊंच्या हातून अशीच घडत राहो आणि नागपूरचा छोटासा विवेक लवकरात लवकर पूर्णपणे निरोगी होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# निफाड तालुक्यातील चार शिवरस्ते खुले झाले, शेतकरी वर्गाकडून समाधान व्यक्त






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नामदार बावनकुळे महसूल मंत्री, जमा. आयुष प्रसाद,जिल्हाधिकारी नाशिक. शशिकांत मंगरुळे उपविभागीय अधिकारी, विशाल नाईकवाडे तहसीलदार निफाड, राजेंद्र भाबड उपअधीक्षक भूमी अभिलेख यांचे आदेशाने व शरद घाडगे महसूल सहाय्यक, मच्छिंद्र भारस्कर शिरस्तेदार व भूमि अभिलेख इत्यादींच्या सहकार्याने आज निफाड तालुक्यातील चार रस्ते यशस्वीपणे शांततेत खुले झाले.

१) मौजे रुई ते खेडलेझुंगे बोरमाथा रस्ता.

मा. जयंत लिलके मंडळ अधिकारी देवगाव यांनी, बागुल साहेब भुमिअभिलेख, प्रतीक हजारे भुकरमापक ,ए.पी.आय मोहन पाटील साहेब, मुरडणकर पोलीस हवालदार, नागरे पोलीस कॉन्स्टेबल, बागुल साहेब भुमिअभिलेख रुपेश पाटील भुकरमापक, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, पोलीस पाटील यांच्या सहकार्याने वीस वर्षापासून बंद असलेलं दोन किलोमीटर लांबीचा रस्ता लगतच्या शेतकऱ्यांच्या उपस्थितीत खुला केला.

२) दात्याने - जिव्हाळे शिवरस्ता.

मा. शशिकांत विधाते मंडळ अधिकारी ओझर यांनी प्रदीप कुटे भूकरमापक,शुभम नांद्रे ग्राम महसूल अधिकारी, दोंदे पोलीस हवालदार, ए अर जकाते सहाय्यक कृषी अधिकारी, ज्योती जेठवा ग्राम पंचायत अधिकारी यांचे सहकार्याने व राहुल लोखंडे पोलीस पाटील, शेतकरी गणपत धनवटे,दशरथ वनवे, सागर गवळी,सुयोग गायकवाड यांच्या उपस्थिती तरस्ता खुला करण्याची कार्यवाही पूर्ण केली.

३) मौजे कुंदेवाडी - रौळस शिव रस्ता.

अश्विनी भोसले मंडळ अधिकारी निफाड यांनी,राजेंद्र लगडे, अक्षय बावस्कर दुर्वास देवरे ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी इत्यादींच्या सहकार्याने लगतच्या शेतकऱ्यांच्या उपस्थितीत रस्ता पूर्ण खुला केला.

४)आहेरगाव - वडनेरभैरव ग्रामीण मार्ग.

ज्ञानेश्वर केसरे मंडळ अधिकारी पालखेड (मिरचीचे)यांनी, जागीरदार मॅडम व मंडळातील इतर सर्व ग्राम महसूल अधिकारी अधिकारी, आवारे,ए पी आय अनिल जाधव,निलेश ताडगे, वायकांडे, वनिता जाधव पोलीस विभाग, संदीप पाटील ग्रामपंचायत अधिकारी, विजय वाळुंज पोलीस पाटील रामदास वाळूज तंटामुक्ती अध्यक्ष ,कृती समिती सदस्य सुरेश वाटपाडे,राजाराम वाटपाडे,शैला वाटपाडे सुनील बसते, वाल्मीक रसाळ,प्रकाश वाटपाडे,अशोक घुगे इत्यादी शेतकऱ्यांच्या उपस्थितीत रस्त्यात असलेला द्राक्ष बाग काढून रस्ता खुला केला.

अशाप्रकारे आज चार असते खुले झाले,

संतोष डुंबरे मंडळ अधिकारी विंचूर यांनी धारणगाव खडक धानोरे शिवरस्ता खुला करण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे.

निफाड तालुक्यातील चार रस्ते खुले झाले बद्दल संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी पदाधिकारी, उपस्थित शेतकरी यांचे अभिनंदन केले




# २२ मे रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जीमाका : मंत्री ग्रामविकास व पंचायतराज महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती सोलापूर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर जिल्हा नियोजन समितीची बैठक शुक्रवार दि. २२ मे २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह नियोजन भवन सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

बैठकीची विषयसूची पुढीलप्रमाणे :-

* बैठकीत जिल्हा नियोजन समितीच्या मागील बैठकीचा इतिवृत्तांत व त्यावरील कार्यवाही अहवालास मान्यता देणे.
* जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनेच्या दि. ३१ मार्च २०२६ अखेरच्या खर्चास मान्यता देणे.
* तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ च्या कामांच्या प्रारूप आराखड्यास मान्यता देणे.आदी विषयांवर चर्चा होणार आहे.
* तसेच मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषयही चर्चेस घेण्यात येणार आहेत.

सदर बैठकीस संबंधित अधिकारी व सदस्यांनी परिपूर्ण माहितीसह स्वतः उपस्थित रहावे. प्रतिनिधी पाठवू नयेत, असे आवाहन जिल्हाधिकारी एस.कार्तीकेयन यांनी केले आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली दखल; दिले परिवहन विभागाला कार्यवाही करण्याचे निर्देश**

**आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याला यश**

# पंढरपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होण्याचा मार्ग मोकळा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर आणि परिसरातील नागरिकांना वाहन नोंदणी, परवाने, फिटनेस तपासणी व इतर परिवहन विषयक कामासाठी सोलापूरला जावे लागत असल्याने नागरिकांचा वेळ व आर्थिक अडचणीशी सामना करावा लागत नागरिकांच्या सोयीसाठी पंढरपुर येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालयाची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. या मागणीची दखल घेऊन पंढरपूर- मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पंढरपूर येथे नवीन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्यात यावे. अशी आग्रही मागणी केली होती. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिवहन विभागाला कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने संबंधित विभागांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर लवकरच पंढरपुरात नवीन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होण्याचा मार्ग आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्यामुळे मोकळा झाला आहे.

पंढरपूर येथील श्री विठ्ठल मंदिर हे दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. लाखो वारक-यांचे श्रध्दास्थान व उभ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या श्री क्षेत्र पंढरपूर हे चैत्री, आषाढी, कार्तीकी, माघी यात्रे साठी मर्यादीत न रहता या तिथक्षेत्रात कर्नाटक, आध्रप्रदेश, तामीळनाडू या राज्यातून व देशभरातून वर्षभरात एक कोटी पेक्षा अधिक भाविक पंढरपूर येथे दाखल होत असतात.

पंढरपूर शेजारील मंगळवेढा-सांगोला-मोहोळ-माढा तसेच पंढरपूर शेजारील कासेगांव, लक्ष्मीटाकळी, वाखरी, गोपाळपूर ही निमशहरी म्हणून गावे वसलेली आहेत.

पंढरपूर शहर व ४ निमशहरी गावाच्या लोकसंख्या २ लाखाचे आसपास असल्याने येथे वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून वाहन नोंदणी, परवाना, तपासणी व इतर परिवहन विषयक कामांसाठी नागरिकांना दूरच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात जावे लागते. नागरिकांच्या सोयीसाठी पंढरपूर येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे आमदार समाधान आवताडे यांनी करून यासाठी पाठपुरावा सुरू ठेवला होता.

त्या अनुषंगाने शासन स्तरावर हालचाली सुरू झाल्या असून शासन पत्र क्र. एमव्हीडी ०४२६/प्र.क्र.१२८/परि-४ नुसार, पंढरपूर येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्यासाठी आवश्यक बाबींचा अभ्यास करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याने पंढरपूर येथे नवीन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होण्याचा मार्ग आमदार अवताडे यांच्या पाठपुराव्यामुळे मोकळा झाला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे यांना तातडीने 'झेड प्लस' दर्जाचे पोलीस संरक्षण द्यावे : राजेंद्र कोरके पाटील

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पंढरपुरात प्रांताधिकारी व तहसिलदार यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने या पत्राद्वारे निवेदन देण्यात येते की, आमच्या संघटनेचे राज्य संघटक तथा सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष आणि दैनिक 'जनप्रवास'चे समूह संपादक श्री. संजयजी भोकरे यांच्या हत्येचा कट सांगली पोलिसांनी नुकताच उधळून लावला आहे. या प्रकरणात पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं, चार जिवंत काडतूसं आणि धारदार शस्त्रे जप्त केली आहेत. पोलीस तपासात असे निष्पन्न झाले आहे की, हे आरोपी फेब्रुवारी महिन्यापासून श्री. भोकरे यांची रेकी करत होते. त्यामुळे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक श्री. संजयजी भोकरे यांना तातडीने 'झेड प्लस' दर्जाचे पोलीस संरक्षण द्यावे अशी






मागणी पंढरपूरचे प्रांताधिकारी व तहसिलदार यांच्या कार्यालयास निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके-पाटील व पंढरपूर शहराध्यक्ष शंकरराव कदम यांच्या नेतृत्वाखाली विविध पदाधिका-यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

यावेळी पत्रकार संतोष मोरे, अतुल मोरे, शुभम कोरके, रोहन नरसाळे, श्री कुमार कोरे श्री धनजंय राक्षे, संजय ननवरे, महेश कदम, प्रमोद भोसले, विक्रम कदम, प्रमोद बाबर, समाधान वनसाळे, नितीन करंडे, अण्णा पवार, रामदास नागटिळक, राजेश बादले पाटील बाळासाहेब अमोल गायकवाड , पत्रकार संघाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

या निवेदनात असे म्हटले आहे की, विशेष म्हणजे, अशाच प्रकारे साधारण वर्षभरापूर्वी श्री. सिद्धार्थ संजय भोकरे यांना देखील जीवे मारण्यासाठी पुण्यामधून कट रचण्यात आला होता आणि त्या संदर्भात त्यांना धमकीचे पत्रही प्राप्त झाले होते. यावरून हे स्पष्ट होते की, भोकरे कुटुंबीय हे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या निशाण्यावर आहेत.

सध्याच्या कारवाईनंतर श्री. संजयजी भोकरे यांनी स्वतः 'प्लॅन बी' नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता व्यक्त केली आहे. गुन्हेगारांचे धाडस पाहता, त्यांचा 'प्लॅन बी' कार्यान्वित होण्यापूर्वीच शासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. अंबाबाई तालीम संस्थेच्या जमिनी हडपण्याच्या उद्देशाने हा सर्व प्रकार सुरू असल्याचे प्राथमिक तपासात दिसत आहे.

आमच्या आग्रही मागण्या खालीलप्रमाणे आहेतः

१. श्री. संजयजी भोकरे यांना त्यांच्या जिवाला असलेला गंभीर धोका लक्षात घेऊन तातडीने 'झेड प्लस' (न+) दर्जाचे पोलीस संरक्षण प्रदान करण्यात यावे.

२. वर्षभरापूर्वी सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेल्या धमकीचा आणि आताच्या कटाचा आपसात काही संबंध आहे का, याची सखोल चौकशी व्हावी.

३. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि या कटामागील मूळ 'बोलवता धनी' कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ या मागणीसाठी अत्यंत आग्रही असून, राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन श्री. भोकरे यांना त्वरित कडेकोट सुरक्षा व्यवस्था पुरवावी, अशी मागणी केली आहे.

# संदीप आहेर यांना राज्यस्तरीय कार्य गौरव पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था टाकळीभान नेवासा यांच्या वतीने देण्यात येणारा सन २०२६ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापन व साहित्य सेवा कार्य गौरव पुरस्कार महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड. ता.निफाड येथील संदीप अंबादास आहेर यांना नुकताच जाहीर झाला आहे. हा पुरस्कार सोहळा येत्या २० मे रोजी टाकळीभान, नेवासा येथे



आयोजित करण्यात आला आहे.

चौथ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात संमेलनाचे उद्घाटक-महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष श्री राजन लाखे, संमेलन अध्यक्ष - सुप्रसिद्ध कवयित्री / लेखिका समीक्षक मा.डॉ. सुवर्णा चव्हाण/ गुंड, स्वागत अध्यक्ष सहसंपादक परिषद कार्याध्यक्ष प्रकाश जी कुलथे, आमदार विठ्ठलराव लंघे (नेवासा) आमदार हेमंत ओगले (श्रीरामपूर) आणि इतर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत, उपाध्यक्ष संदीप पटारे, सचिव मिनीनाथ निपुंगे यांनी दिली. ग्रामीण साहित्य संमेलन हे नवोदितांच्या पंखात बळ भरणारे ठरावे, ज्यांनी अपूर्व असे साहित्यिक योगदान दिले, अशा साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील मराठी भाषेची सेवा केलेल्या मान्यवरांचा सन्मान सोहळा प्रबोधन मेळावा म्हणजेच हे ग्रामीण चौथे साहित्य संमेलन , त्यातच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी साहित्यिकांना आणखी उभारी मिळणार आहे. या अनुषंगाने एक दिवसीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाच्या शब्द पंढरीमध्ये या पुरस्काराचे वितरण होणार आहे. या निवडी बद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्ती नाना थेटे, कार्यकारी संचालक दिपक जोंधळे, कार्याध्यक्ष तथा सचिव दत्तात्रय जोंधळे तसेच मुख्याध्यापक अशोक शेळके सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त खासदार प्रणिती शिंदे यांच्यावतीने पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महापराक्रमी हिंदवी स्वराज्याची दुसरे छत्रपती, स्वराज्य रक्षक आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी शहर काँग्रेस अध्यक्ष चेतन भाऊ नरोटे ,जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सातलिंग शटकार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महेश गाडेकर, माझ्या अध्यक्ष भारत जाधव ,आदी मान्यवर उपस्थित होते

तसेच महिला अध्यक्ष प्रमिला तू कलवंडे जिल्हा समन्वय मनोज येलगुलवार योगा अध्यक्ष गणेश डोंगरे राजन कामत श्रीशैल्य रणधीरे हेमाताई चिंचोलकर सुमन जाधव तिरुपती परकी पंढरी पशुमती माशाळ सचिन गुंड शिवाजी साळुंखे संजय गायकवाड सागर उबाळे आप्पासाहेब सलगर विवेकानंद सलगर ज्योती गायकवाड इंगळे शशिकांत इंगळे महेंद्र शिंदे अंजली राठोड चंद्रकांत टिक्के मिलिंद गोरे मनीषा माने साई शिंदे आधी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वेरीच्या सिव्हील इंजिनिअरिंग विभागाचा पालक मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या सिव्हील इंजिनिअरिंग या विभागातर्फे 'पालक मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मेळाव्याच्या निमित्ताने पालक आणि शिक्षक यांच्यात विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने झालेल्या संवादाचा फायदा विद्यार्थ्यांना होणार हे मात्र निश्चित!

याप्रसंगी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी म्हणून दौंडचे महादेव दमगुडे तर महिला पालक प्रतिनिधी म्हणून दुर्गा अमर आवताडे ह्या उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनानंतर सिव्हील इंजिनिअरिंग विभागातर्फे डॉ. माणिक देशमुख यांनी आपल्या विभागातील विशेष बाबी सादर केल्या. यामध्ये त्यांनी प्रयोगशाळेत उपलब्ध असणारी यंत्रसामुग्री, मशीन्स यापासून ते इंडस्ट्रीयल व्हिजीटच्या माध्यमातून प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कसे कामकाज चालते याचे प्रात्यक्षिक, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी आदी बाबींवर प्रकाश टाकला. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण आणि उच्च करिअरची दारे खुली होत असल्याचे सांगण्यात आले. स्वेरीचे संस्थापक व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांसंदर्भात अवलंबिले जाणारे विकासात्मक धोरण, नियोजनात्मक मार्गदर्शन आणि उच्चशिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने स्वेरीत 'गेट' परीक्षेची करून घेतली जाणारी तयारी याबाबत सांगितले. प्रत्येक वर्षी विविध विषयांचे मार्गदर्शन वर्ग आयोजित करून तसेच 'डव्हान्सड टेक्निकल ट्रेनिंग'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अशा परीक्षांसाठी आवश्यक संपूर्ण तयारी करून घेतली जाते. वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या टेस्ट आणि त्यांचे विश्लेषण यामधून विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणातील अद्ययावत माहिती दिली जाते. त्यामुळे स्वेरीतील विद्यार्थ्यांना अशा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळत असल्याचे त्यांनी सांगितले तसेच या परीक्षेसाठी अत्यावश्यक असणारे सर्व स्टडी मटेरियल हे स्वेरीच्या नूतन इमारतीत असलेल्या मुख्य लायब्ररीमधून उपलब्ध करून दिले जाते, असेही सांगितले. यावेळी सिव्हील इंजिनिअरिंग विभागांतील प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. प्लेसमेंट विभागाचे प्रा. अविनाश मोटे यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या 'गेट परीक्षा, स्वेरीमध्ये येणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्या, प्लेसमेंट विभागामार्फत चालणारे कार्य, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढीसाठी व करिअर करण्यासाठी आवश्यक बाबी, इंग्रजी भाषा कौशल्ये, संभाषण कौशल्य, सादरीकरण, प्रकल्प, तांत्रिक प्रशिक्षण इंटर्नशीप, स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी? हे करताना पालकांनी नेमकी कोणती भूमिका घ्यावी ? आदी करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या बाबींची पालकांना माहिती दिली. पालक प्रतिनिधी महादेव दमगुडे म्हणाले की, स्वेरीत केवळ पुस्तकी शिक्षणच दिले जाते असे नव्हे तर शिक्षणाबरोबरच चांगले संस्कारही दिले जातात त्यामुळे येथे विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल आहे. म्हणून आमच्यासारखे अनेक पालक स्वेरीच्या नियमांमुळे प्रचंड समाधानी आहेत. स्वेरीत अभ्यासासाठी सातत्याने पाठपुरावा केला जातो. विद्यार्थ्यांसाठी जादा तास घेतले जावेत तसेच नाईट स्टडी कंपल्सरी असावी. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासाकडे वळतात व त्यांचे भविष्य उज्ज्वल होते ही बाब खरोखर स्वागतार्ह आहे.' यावेळी अशोक द्यावनपल्ली, काकडे, ठोंबरे, चव्हाण, बागल, मोरे, यांच्यासह इतर पालकांनी काही सूचना केल्या असता सहा. विभागप्रमुख डॉ. माणिक देशमुख यांनी काही सूचनांचे निरसन जागीच केले तर काही सूचना महाविद्यालय प्रशासनाबरोबर चर्चा करून पुढील निर्णय घेणार असल्याचे आश्वासन




दिले. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या या पालक मेळाव्यात जवळपास २०० पालक, तसेच सिव्हील विभागातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा.पी. बी. भागानगरे यांनी पालक मेळाव्याचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

### शेतकऱ्यांसाठी वाहतुकीचा मार्ग खुला; प्रशासनाच्या कारवाईचे स्वागत

### ग्रामस्थांनी व्यक्त केले समाधान

# ५० वर्षांनंतर चितेगाव-चेहेडी शिव रस्ता अतिक्रमणमुक्त






> गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला चितेगाव-चेहेडी शिव रस्ता प्रशासनाने समन्वयातून अतिक्रमणमुक्त करून खुला केला, ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय दूर होणार असून ग्रामीण भागातील विकासाला गती मिळेल. प्रशासनाने लोकहिताचा निर्णय घेतल्याबद्दल सर्व संबंधित अधिकारी आणि ग्रामस्थांचे अभिनंदन.
>
> **- आमदार दिलीप बनकर**
> **निफाड**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील चितेगाव-चेहेडी दरम्यानचा तब्बल ५० वर्षांपासून बंद असलेला शिव रस्ता अखेर अतिक्रमण हटवून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. शुक्रवार दि. १५ मे २०२६ रोजी महसूल प्रशासन, भूमी अभिलेख विभाग आणि ग्रामस्तरावरील अधिकाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही कारवाई करण्यात आली. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मा. डॉ. शशिकांत मंगरुळे (उपविभागीय अधिकारी), मा. विशाल नाईकवाडे (तहसीलदार, निफाड) तसेच मा. राजेंद्र भाबड (उप-अधीक्षक, भूमी अभिलेख) यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात आली. मंडळ अधिकारी जयंत लिलके यांनी संबंधित शेतकऱ्यांची पूर्वबैठक घेऊन रस्त्याचे महत्त्व समजावून सांगितले. त्यानंतर शशिकांत बैरागी (भूमी अभिलेख, निफाड) यांनी रस्त्याच्या हद्दी व खुणा निश्चित केल्या.

यानंतर सुमारे १ किलोमीटर लांबीचा व ९ मीटर रुंदीचा चितेगाव-चेहेडी शिव रस्ता अतिक्रमणमुक्त करण्यात आला. अनेक दशकांपासून बंद असलेला हा रस्ता खुला झाल्याने शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतूक, शेतीकामासाठीची ये-जा आणि ग्रामसंपर्क अधिक सुलभ होणार आहे.

या मोहिमेत ग्राम महसूल अधिकारी शेखर पाटील, अबोली साळवे, कैलास अहिरे, पूर्वा राठोड, पोलीस हवालदार जाधव, संबंधित ग्रामपंचायत अधिकारी तसेच तंटामुक्ती अध्यक्ष दशरथ रूमणे यांनी सक्रिय सहकार्य केले. यावेळी चितेगाव आणि चेहेडी येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य संघटक संजय भोकरे यांना पोलीस संरक्षणाची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## संजय भोकरे यांच्या पाठीशी राज्य सरकार खंबीरपणे उभे... संरक्षण देण्याचे तातडीने आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/सांगली : भोकरे यांना मि पुर्णपणे ओळखतो त्यांनी पत्रकारीता शैक्षणिक सामाजिक कार्यात मोलाचे योगदान असून अशा लोकांची सुरक्षा करणे हे आमच्या सरकारचे कामं आहे तर त्यांना पोलीस संरक्षण देण्याचे आदेश दिले आहे तर सांगलीत घटनेचा निषेध व्यक्त केला महाराष्ट्र राज्य हे सुजलाम सुफलाम राज्य असुन गुंडागिरीचा बंदोबस्त करण्यासाठी आमचे सरकार या प्रकरणात लक्ष घातले असून पालकमंत्री नामदार चंद्रकांत दादा यांच्या कडुन माहिती प्राप्त झाली आहे पोलीस यंत्रणा या प्रकरणाचा छडा लावण्यात यशस्वी ठरेल असा मला विश्वास असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना सांगितले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक आणि 'दैनिक जनप्रवास'चे समूह संपादक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट सांगली पोलिसांनी उधळून लावला आहे. या प्रकरणी तीन संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून पिस्तूल आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, भोकरे यांना तातडीने राज्य भरात फिरताना पोलीस संरक्षण देण्याची मागणी आज पत्रकार संघाने मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे मंत्रालयात प्रत्यक्ष भेटून केली आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे महासचिव डॉ. विश्वास आरोटे, प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव मंत्रालय संपर्कप्रमुख विष्णू बुरे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ब्रँड अँबेसेडर संजय फुलसुंदर, आणि संघाचे सदस्य खंडूराज गायकवाड यांचा शिष्टमंडळात समावेश होता.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री.भोकरे यांना संरक्षण देण्याची मागणी मान्य केली.

**रेकी करून हत्येचा प्रयत्न**

अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून दोन देशी बनावटीची पिस्तूलं, चार जिवंत काडतूसं आणि इतर घातक शस्त्रे हस्तगत करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, हे आरोपी फेब्रुवारी महिन्यापासून संजय भोकरे यांची 'रेकी' (पाळत ठेवणे) करत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. अंबाबाई तालीम संस्थेच्या जमिनी हडपण्याच्या उद्देशातून हा सर्व प्रकार सुरू असल्याचे प्राथमिक तपासात दिसत आहे.





**'प्लॅन बी'ची भीती**

या कारवाईनंतर संजय भोकरे यांनी स्वतः 'प्लॅन बी' नुसार पुन्हा हल्ला होण्याची दाट शक्यता व्यक्त केली आहे. यावरून संपूर्ण भोकरे कुटुंब गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या निशाण्यावर असल्याचे स्पष्ट होत आहे.

**पत्रकार संघाच्या प्रमुख मागण्या:**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात खालील मागण्या केल्या आहेत:

■ संजय भोकरे यांच्या जीविताला असलेला धोका लक्षात घेता त्यांना राज्यभर फिरावे लागते त्यांना राज्यभर कडेकोट पोलीस संरक्षण मिळावे.

■ या कटामागील मुख्य 'बोलविता धनी' कोण आहे, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी.

# शेतकऱ्यांची दिशाभूल करून शक्तीपीठ महामार्ग रेटण्याचा शासनाचा प्रयत्न : राजु शेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा शक्तीपीठ महामार्गास तीव्र विरोध असून राज्य सरकारने जबरदस्तीने शेतकऱ्यांची संयुक्त मोजणी करण्याचे प्रयत्न केल्यास अधिकाऱ्यांना जशास तसे उत्तर देवून हा महामार्ग पिटाळून लावू असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांनी पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या शक्तीपीठ विरोधी कृती समितीच्या बैठकीत दिला.



मोबदल्याची चुकीची आकडेवारी सांगून राज्य सरकारने शेतकऱ्यांची दिशाभूल करून शक्तीपीठ महामार्ग रेटण्याचा प्रयत्न करत आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी ऊस पिकाबरोबर फळबागा, द्राक्ष, केळी यासारखी पिके घेत असून पिकाखालील बागायती क्षेत्रात मोठी घट होणार असल्याने अनेक ग्रामपंचायतींनी या शक्तीपीठ महामार्गास विरोध केला आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यातून सांगली, कोल्हापूर, सातारा व कराड याठिकाणी जाण्यासाठी पर्यायी सहा रस्ते उपलब्ध आहेत.

त्याबरोबरच उजनी धरणातून भीमा नदीत पाण्याचा विसर्ग बंद असल्याने पिके वाळू लागली आहेत. वाळू ठेकेदारांशी संगनमत करून वाळू उपसा करण्यासाठी नदीपात्र कोरडे ठेवले जात आहे. यामुळे तातडीने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात यावा अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी मिळून भीमा नदीपात्रात आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# विठ्ठल रुक्मिणीमातेच्या तुळशी अर्चन पूजेची १६ मे पासून ऑनलाईन नोंदणी : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची तुळशी अर्चन पूजा मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत असून दि. १७ ते २४ मे, २०२६ या कालावधीतील तुळशी अर्चन पुजेची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि. १६ मे रोजी स.११.०० पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

**दि. १७ ते २४ मे, २०२६ मधील पुजांची होणार नोंदणी**

या पूजेसाठी रुपये २१००/- इतके देणगी मूल्य आहे. दिनांक १७ ते २४ मे या कालावधीतील गर्दीचे व सण- उत्सवाचे दिवस वगळून भाविकांना पूजा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे.

ऑनलाइन नोंदणीसाठी काही अडचणी आल्यास मंदिर समितीच्या नित्योपचार कार्यालयातून नोंदणी करून देण्यास मदत व आवश्यक ते मार्गदर्शन करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच अधिक माहितीसाठी मंदिर समितीच्या ०२१८६ -२९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा असे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी यावेळी सांगितले.

# विभागीय आयुक्तपदी शीतल तेली-उगले यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे / सोलापूर : महाराष्ट्र शासनाने २००९ बॅचच्या आयएएस अधिकारी शीतल तेली-उगले यांची पुणे विभागाच्या विभागीय आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. त्यांनी या पदाचा कार्यभार माजी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवाड यांच्याकडून स्वीकारला. २१ नोव्हेंबर २०२२ पासून २१ मे २०२५ पर्यंत शितल तेली या सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त म्हणून कार्यरत होत्या.



शीतल तेली-उगले या यापूर्वी पुण्यातच क्रीडा व युवा सेवा आयुक्त म्हणून कार्यरत होत्या. प्रशासकीय अनुभव आणि विविध विभागांतील कामकाजामुळे त्यांची ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, डॉ. चंद्रकांत पुलकुंडवाड यांची मंत्रालयात ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या सचिवपदी बदली करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या या प्रशासकीय बदलामुळे पुणे विभागाच्या प्रशासनात नव्या नेतृत्वाची सुरुवात झाली आहे.

# यूपीएससीच्या वनसेवा परीक्षेत बार्टीच्या दोन विद्यार्थ्यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी संघ लोकसेवा आयोग (युपीएससी) मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येते. तसेच मुख्य परीक्षा व मुलाखत चाचणी परीक्षेकरिता पात्र झालेल्या उमेदवारांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

दि. मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या संघ लोकसेवा आयोग- वन सेवा - २०२५ परीक्षेच्या निकालात बार्टीच्या २ विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे.





या निकालात बार्टी संस्थेच्या विद्यार्थ्यांची निवड झाली असून विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे रँक मिळाल्या आहेत.

१) कबीर राहुल कांबळे - रँक १२५

२)अक्षय विजय बर्हे - रँक १४०

संघ लोकसेवा आयोग- वन सेवा - २०२५ मुख्य परीक्षेकरीता ५२ विद्यार्थ्यांनी आर्थिक सहाय्य व त्यापैकी १० विद्यार्थ्यांनी मुलाखत आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतला होता.

या सर्व विद्यार्थ्यांना बार्टी संस्थेकडून परीक्षेच्या विविध टप्प्यावर मार्गदर्शन व आर्थिक साहाय्य देण्यात आले आहे...

यशस्वी विद्यार्थ्यांचे बार्टीच्या महासंचालक श्रीमती दीपा मुधोळ- मुंडे, निबंधक डॉ सुचिता शिंदे व विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

**एकाच छताखाली महसूल, कृषी, पुरवठा व भूमी अभिलेख विभागाच्या सेवा; शेकडो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग**

# तळवली-खानिवली रोड येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरा अंतर्गत भिवंडी तालुक्यातील राहूर मंडळातील कोशिंबी येथील जीवन विकास सेवा ट्रस्ट अनाथ आश्रम, तळवली-खानिवली रोड, नाशिक महामार्गालगत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला पंचक्रोशीतील शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

याशिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी फरोग मुकादम, भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे, तहसीलदार अभिजीत खोले, नायब तहसीलदार आदेश म्हात्रे, मंडळ अधिकारी रवी काळे यांच्यासह परिसरातील पोलिस पाटील, सरपंच आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी विविध समस्यांबाबत अधिकाऱ्यांशी संवाद साधत शिबिरातील सुविधांचा लाभ घेतला.

शिबिरामध्ये महसूल, कृषी, पुरवठा विभाग, भूमी अभिलेख विभाग तसेच ऑनलाइन केवायसी संदर्भातील विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक दाखले, उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, डोमासाईल प्रमाणपत्र, १५५ दुरुस्ती आदेश, डिजिटल सातबारा वाटप, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, शिधापत्रिका संदर्भातील सेवा, स्वगणना मार्गदर्शन, ई-केवायसी आणि किसान आयडी नोंदणी यांसारख्या सुविधा नागरिकांना एकाच ठिकाणी देण्यात आल्या.

तसेच जमिनी संदर्भातील प्रलंबित फेरफार प्रकरणे, तुकडाबंदी संदर्भातील कामे आणि इतर महसुली अडचणींचे निराकरण करण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती. विविध दाखल्यांचे वाटप तहसीलदार अभिजीत खोले, शिवसेना नेते प्रकाश पाटील आणि आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.



याशिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी रवी काळे यांनी विशेष परिश्रम घेतले. याशिवाय तलाठी एन. पी. तुगावे, विजय लोहकरे, प्रथमेश मोरे, सुदाम वाघे, भगवान पाटील, अंकुश गावंडे, लिपीक मेघा चौधरी, पवार भाऊसाहेब, पुरवठा व मोजणी विभागाचे कर्मचारी तसेच कोतवाल सारिका जाधव, जागृती कातवारे आणि महेश थोरात यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले.

यावेळी तहसीलदार अभिजीत खोले, शिवसेना नेते प्रकाश पाटील आणि आमदार शांताराम मोरे यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. महसूल विभागाच्या या उपक्रमामुळे सर्व शासकीय सेवा नागरिकांना एकाच छताखाली उपलब्ध झाल्याने शिबिराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# टाकळीवाडी ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी; अनेक नेते मंडळींनी ठोकले शड्डू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिराळ ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी आता चांगलीच रंगू लागली असून गावातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध गट आणि आघाड्यांच्या बैठका सुरू झाल्या असून अनेक इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीच्या आखाड्यात उतरून जोरदार तयारीला सुरुवात केली आहे.

ग्रामपंचायतीवर सत्ता मिळवण्यासाठी गावातील अनेक नेते मंडळींनी शड्डू ठोकले असून मतदारांच्या भेटीगाठी, प्रचाराचे नियोजन तसेच कार्यकर्त्यांच्या बैठका यांना वेग आला आहे. गावाच्या विकासाच्या मुद्द्यावर विविध गटांकडून आश्वासने दिली जात असून युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्येही निवडणुकीबाबत उत्सुकता वाढली आहे.

यावेळी पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा तसेच ग्रामविकासाचे विविध प्रश्न हे निवडणुकीतील प्रमुख मुद्दे ठरण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी नव्या चेहऱ्यांना संधी देण्याची चर्चा सुरू असून पारंपरिक राजकारणाला पर्याय निर्माण करण्याचे प्रयत्नही होताना दिसत आहेत.

दरम्यान, ग्रामपंचायत निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले असून आगामी काळात राजकीय हालचालींना आणखी वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.